Impact Factor – 6.625 ▪ Special Issue - 000 ▪ December 2020 ▪ ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

**PEER REVIEWED, INDEXED AND REFEREED JOURNAL**

# डॉ. सुनिल शिंदे सेवापूर्ती निमित्त
# संशोधन लेखसंग्रह



– मुख्य संपादक –

**डॉ. धनराज टी. धनगर**

– संपादक मंडळ –

डॉ. अजय गव्हाणे प्रा.डॉ. सुरेश भालेराव प्रा. ज्ञानोबा ढगे

प्रा.डॉ.अविनाश पांचाळ प्रा.डॉ.पंडित लांडगे प्रा.संतोष कोल्हे प्रा.डॉ.भालचंद्र धर्मापुरीकर

*Printed by :* PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

# – अनुक्रमणिका –

## मराठी

1. **‘जीवनायन’ मधून प्रतिबिंबित झालेले आंबेडकरी विचार** ........ 1
डॉ. उषा सोरते

2. **“कोव्हीड 19: विषाणू संसर्ग प्रादूर्भाव आणि आर्थिक परिणाम”** ........ 4
डॉ. दिगंबर बिरादार

3. **विश्वाला गांधीजींच्या विश्वस्त संकल्पनेचा एकमेव पर्याय** ........ 5
प्रा. डॉ. महादेव बेलखेडे

4. **अण्णाभाऊ साठे आणि संयुक्त महाराष्ट्र आंदोलन चळवळ** ........ 8
प्रा. भागवत शंकर महाले

5. **महात्मा गांधीजीचे राजकीय विचार : प्रासंगिकता व भविष्य** ........ 12
प्रा. डॉ. बोचरे जे. एम.

6. **‘महात्मा गांधी व अस्पृश्यता निवारण’** ........ 14
प्रा. चव्हाण. डि. आर

7. **राष्ट्र विकासातील मानवेंन्द्रनाथ रॉय यांचे विचारधन** ........ 16
प्राचार्य डॉ. मनोहर तुकाराम पाटील, डॉ. संभाजी संतोष पाटील

8. **संत गाडगेमहाराज बहुजनांचे कैवारी** ........ 21
डॉ. उर्मिला क्षीरसागर

9. **कोरोनाचे आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, आरोग्य क्षेत्रावरील परिणाम** ........ 23
प्रा. डॉ. श्रीनिवास भोंग

10. **महात्मा गांधीजींचे राजकिय विचार व समग्र तत्वज्ञानाची प्रासंगीकता व भविष्य** ........ 27
प्रा. डॉ. संजय वामनराव भोळे

11. **महात्मा गांधीचे अहिंसेसंबंधी विचार** ........ 31
प्रा. डॉ. कऱ्हाळे विलास लिंबाजी

12. **महात्मा गांधी आणि सामाजिक, आर्थिक, राजकीय विचार** ........ 33
डॉ. आर. के. काळे

13. **महात्मा गाांधीर्जीचे राजकीय विचार : प्रासांगिकता व भविष्य** ........ 36
प्रा. डॉ. केशव दत्तराव तिडके

14. **महात्मा गांधीजी राजकीय विचार–प्रासंगिकता व भविष्य** ........ 38
प्रा. के. एस. चव्हाण

15. **साठोत्तर महाराष्ट्राच्या समृध्द कलापरंपरेचा ऐतिहासिक आढावा** ........ 40
प्रा. केदार रविंद्र केंद्रेकर

16. **आंतरराष्ट्रीय समस्या व महात्मा गांधीच्या विचारांची उपयुक्तता** ........ 44
डॉ. कांतीलाल डी. सोनवणे

17. **म. गांधींचे राजकीय तंत्र व सत्यागृहासंबधीचे विचार** ........ 47
प्रा. ऊध्दव गणपतराव निर्वळ, डॉ. पंजाब चव्हाण

# महात्मा गांधी आणि सामाजिक, आर्थिक, राजकीय विचार

**डॉ. आर. के. काळे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
बलभीम महाविद्यालय, बीड.

**प्रस्तावना :**

भारतीय इतिहासात महात्मा गांधी हे एक असामान्य असे व्यक्तिमत्व होऊन गेलेले आहे. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात गांधीजीचे कार्य मोलाचे आहे, त्यांनी आपल्या आचरणातून, विचारांमधून सामान्य जनतेमध्ये सुधारणा घडवून आणण्याचे कार्य केलेले आहे. गांधीजींना सामान्य जनतेविषयी विशेषत: गरीबांविषयी नेहमीच कळवळ असलेली दिसून येते. गांधीजींच्या विचारांमध्ये गरीब व शोषित जनता नेहमीच केंद्रस्थानी होती. गरीबांशी ते एकरुप झालेले दिसून येतात. त्यामुळेच त्यांनी गरीबांसारखाच वेष धारण केलेला दिसून येतो. आधुनिक भारतीय आर्थिक विचारसरणीत मोहनदास करमचंद गांधी यांचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. हे गांधीचे टिकाकार मान्य करतात ते प्रामुख्याने अध्यात्मवादी व मानवतावादी विचारवंत म्हणुन ओळखले जातात. धर्म आणि राजकारण यांचा सुंदर समन्वय साधुन त्यांनी राजकारणाला व्यवहारिक अशी नवी अध्यात्मवादी दृष्टि दिली. मानवता हा त्यांचा केंद्रबिंदु असुन मानव मुळातच चांगला असतो यावर त्यांची नितांत श्रध्दा होती साध्य आणि साधन सुचिता हा त्यांच्या विचारंचा गाभा असून अन्यायाचा प्रतिकार सत्य अहिंसा व सत्याग्रहाच्या मार्गाने करता येतो हे त्यांनी आपल्या विचारतून व कृतीतुन दाखवून दिले. बलाढ्य साम्राज्य शक्तीचा प्रतिकार अहिंसेच्या मार्गाने करता यतो हे त्यांनी जगाला दाखवुन दिले त्यामुळे त्यांचे एकुणच विचार 'गांधीवादी' या नावाने ओळखले जाऊ लागले. गांधीवाद एक प्रखर तत्वज्ञान बनल्यामुळे त्यांची आवश्यकता संपूर्ण जगाला भासू लागली आहे.

महात्मा गांधीजीचे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विचार आजच्या युगात अतिशय उपयुक्त आहेत ते पुढील प्रमाणे सांगता येतील.

**महात्मा गांधीजीचे सामाजिक विचार :**

जाती व्यवस्था ही हिंदुस्थानाची मुलभूत सामाजिक समस्या आहे यासंबंधी गांधीजीनी १९२१-२२ च्या नवजीवन या गुजराती साप्ताहिकातुन विस्ताराने चर्चा केली आहे. जो लेख गुजराती भाषेतुन लिहिला गेला हा लेख गांधी शिक्षण या ग्रंथाच्या दुसऱ्या खंडात पुर्नग्रहण करण्यात आला. त्यातील काही भाग सामाजिक रचनेसाठी उपयुक्त आहे.

१. हिंदु समाज जिवंत आहे याला कारण हिंदु समाजाचा आधार जातीव्यवस्था आहे हे होय असा माझा विश्वास आहे.
२. स्वराज्याची बिजे जाती व्यवस्थेत शोधावी लागतील वेगवेगळ्या जाती या सेवेसाठी स्थापन केलेल्या वेगवेगळ्या विभागासारख्या आहेत.
३. जाती व्यवस्था हे नियंत्रण व्यवस्थेचे दुसरे नाव आहे जात ही विलासी प्रवृतीवर नियंत्रण ठेवते.
४. जाती व्यवस्था नष्ट करून युरोपची पाश्चिमात्य सामाजिक व्यवस्था स्वीकारणे याचा अर्थ हिंदुनी आपली पिढ्यान्पिढ्या वंशपरंपरागत चालत आलेली रोजगाराच्या हमीची जी विकोपर्ननाची व्यवस्था त्यागणे असाच होईल हे तत्त्व आहे हे बदलणे म्हणजे अव्यवस्था निर्माण करणे होय.
५. जाती व्यवस्था ही समाजाची स्वाभाविक व्यवस्था आहे. हिंदुस्थानात या व्यवस्थाला धर्माचे अधिष्ठान प्राप्त झाले आहे इतर देशांना जाती व्यवस्थेची उपयोगीता समजलीच नाही त्यामुळे त्या देशात ही व्यवस्था सैल स्वरूपात अस्तित्वात आहे. म्हणून जाती व्यवस्थेचे जे लाभ हिंदुस्थानाला मिळतात त्या लाभापासून हे देश वंचित आहेत. हे माझे जातीव्यवस्थेसबंधी विचार आहेत.

खेड्यातील लोक वर्णवस्थेच्याद्वारा आपला अंतर्गत कारभार सांभाळीत आणि वर्णव्यवस्थेमार्फत एक किंवा अनेक राजसत्तांकडून होणाऱ्या कोणत्याही प्रकाराच्या जुलूमाला तोंड असते ते राष्ट्र अशा रितीने वर्णपध्दतीतून आपली कौतुकास्पद संघटनशक्ती उत्पन्न करायला समर्थ होऊ शकत होते. त्या राष्ट्रात समाज व्यवस्था करण्याचे सामर्थ्य नव्हते असे कदापी म्हणता येणार नाही.

**महात्मा गांधीचे आर्थिक विचार :**

हिंदुस्थानातील सामाजिक रचनेबाबत गांधीजीचे विचार पाहिल्यानंतर त्यांची आर्थिक प्रश्नासंबंधी विचार पाहु. म. गांधी यांचे आर्थिक विचार हे सत्य, अहिंसा, श्रम आणि प्रतिष्ठा व साधेपणा या तत्वावर आधारित आहेत त्यांच्या मते अर्थशास्त्र आणि नितीशास्त्र यांना परस्परापासून वेगळे करण्याचे कारण नाही किमान गरजा आणि साधी राहणी गृहीत धरून त्यांनी आपले आर्थिक विचार मांडले मनुष्याने आपल्या गरजा मर्यादित केल्या. राहणी साधी ठेवली तर मनुष्याला सुख आणि समाधान प्राप्त होईल असे गांधीजीना वाटत होते म. गांधीनी मांडलेले काही आर्थिक विचार पुढील प्रमाणे -

**ग्रामोद्योग :**

आपला देश हा कृषीप्रधान असुन तो अनेक खेड्या-पाड्यांनी बनलेला आहे तसेच वास्तव गांधीजींच्या आर्थिक विचाराचे मुख्य सूत्र होय. आपल्या देशाला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवायचे असेल तर 'खेडे' हा घट केंद्रबिंदू मानला पाहिजे. ती स्वावलंबी व स्वयंपूर्ण कशी होतील ह्या दिशेने त्यांनी पाऊले उचलली, 'ग्रामस्वराज्य',

'ग्रामीणअर्थशास्त्र', 'गांधीवादी नियोजन' इत्यादी संज्ञा त्यामुळे किती अर्थवाहक आहेत. ह्याचा प्रत्यय आपणास येऊन शकेल. गांधीजींनी भारताच्या अर्थव्यवस्थेत सुधारणा आणि आर्थिक विकास घडवून आणण्याचा विचार मांडला असता तरी त्यांचा मोठ-मोठ्या उद्योगांना आणि यांत्रिक उत्पादनाला विरोध होता. याचे मुख्य कारण म्हणजे भारतात मनुष्यबळ विरोध होता. याचे मुख्य कारण म्हणजे भारतात मनुष्यबळ खुपच आहे आणि त्याचा वापर झाला पाहिजे असे त्यांना वाटत होते. गांधीजींच्या अर्थशास्त्र ग्रामोद्योगाला अग्रस्थान दिले होते. ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी त्यांनी ग्रामोद्योगाला महत्त्व दिले होते आणि ग्रामोद्योगातही प्रामुख्याने खादी उत्पादन-हस्तकला व्यवसाय व इतर लहान-सहान उद्योग त्यांना त्यांनी महत्त्व दिले होते. ग्रामोद्योगांचा विस्तार आणि विकास झाल्यास खेड्यातील लोकांना शेतीची कामे करुन राहिलेल्या रिकाम्या वेळात रोजगार मिळेल तर काही प्रमाणात पूर्णवेळ बेकारीही नष्ट होईल. त्याचबरोबर खेड्यांची अर्थव्यवस्था सुधारेल आणि खेडी स्वावलंबी होतील. असा गांधीजींना विश्वास वाटत होता म्हणूनच म.गांधीजींनी हे वेळीच ओळखले होते खेड्यात राहणाऱ्यांना उपजीविकेचे साधन खेड्यात उपलब्ध करुन दिल्यास खेड्यातील माणसांचे लोंढे उपजीविकेसाठी व रोजगारासाठी शहराकडे धाव घेणार नाहीत. दुसरे असे की, खेड्यातील माणसे शहरांमध्ये रोजगारासाठी व पोटापाण्यासाठी येत राहतील तर शहरांचे प्रश्नही बिकट बनतात. ही गोष्ट आम्हा सर्वांना अनेक वर्षात प्रत्ययास आली आहे.

**खादीविषयक विचार :**

खेडूतांचा वेळ योग्य सतकारणी लावून श्रम प्रतिष्ठेतून सामाजिक सबलीकरण साधण्याचा खादी हा एक प्रकल्प होता. चरख्याला ते कामधेनू मानत सर्व उद्योगाचा केंद्रबिंदू म्हणून ते चरख्याचा विचार करत प्रत्येक घरात एक चरखा आणि खेड्यात हातमाग असावा खेड्याचे शोषण थांबविण्यासाठी व खेडी स्वावलंबी व स्वयंपूर्ण करण्यासाठी खादी आवश्यक मानतात. खादीच्या उत्पादनासाठी प्रत्येकाने आपल्याला आवश्यक तेवढा कापुस पिकवावा. कापूस वेचणे, साफ करणे, पिंजणे, कातणे, रंग देणे विणणे इत्यादी गोष्टी खेड्यातील व्यक्तीकडूनच करुन घेतल्या पाहिजेत. गांधीजी दारिद्र्य उपासमार बेकारी या समस्यावर मात करण्यासाठी खादी प्रचारावर भर देतात. खादी कार्यक्रम म्हणजे आपल्या जीवनाच्या सर्व गरजा देशांतूनच आणि त्याही खेड्यातील लोकांच्या श्रम आणि बुद्धीचा उपयोग करुन भागविण्याची एक कृती आहे. खादी देशातील सर्व लोकांच्या स्वातंत्र्याची समतेची गुरुकिल्ली आहे. ती एक सर्वव्यापी स्वदेशी मनोवृत्ती आहे. म्हणून कार्यकर्त्यांनी खादीचा प्रामाणिकपणे प्रचार करावा असे गांधीजींना वाटत असत. नेहरुजी तर खादीला स्वतंत्र्याला पोशाख मानतात.

**विश्वस्त संकल्पना :**

गांधीजी आर्थिक सत्तेच्या केंद्रीकरणाचे कठोर विरोधक होते. त्यातूनच दक्षिण आफ्रिकेतून आपल्या वास्तव्यात गांधीजींनी विश्वस्ताची संकल्पना मांडली. गांधीजीच्या या संकल्पनेचे मुलाधार आपल्याला उपनिषदात सापडतात. त्याची विश्वस्ताची कल्पना ही त्यांनीच मांडलेल्या अपरिग्रहाच्या कल्पनेचा विकास आहे. आपल्याकडे असलेली अतिरिक्त संपत्ती ही आपले उपभोग साधन नसुन समाजातील हीनदीन पददलितांच्या उत्थानासाठी आपल्याकडे विश्वासाने ठेवलेले ते धन आहे. त्यामुळे त्याचा विनियोग स्वउपभोगासाठी नसून समाजोत्थानासाठी आहे याची भान असणे हा 'विश्वताचा' आशय आहे.

१. सर्व संपत्ती ही ईश्वराची आहे.
२. संपत्तीचा वापर मात्र मनुष्याकडून केला जातो.
३. प्रत्येकाने आपल्याकडील अतिरिक्त संपत्तीचा वापर चैन व ऐशआरामीसाठी न करता दिनदुबळ्या लोकांच्या हितासाठी करावा.
४. समाजातील श्रीमंत लोकांनी संपत्तीचे विश्वस्त म्हणून काम करावे. म्हणजेच आपल्या संपत्तीचा वापर सर्वांनसाठी न कसा सामाजिक हितासाठी करावा. विश्वस्ताची योजना उद्योजक भांडवलदार, जमीनदार, कारखानदार, सावकार या सर्वांनाच लागू राहील.
५. हे श्रीमंत लोक जर विश्वस्त म्हणून श्रम करीत नसतील तर त्यांच्या विरुद्ध सत्यागृह करावा. अहिंसात्मक मार्गाने त्याचे ह्रदय परिवर्तन करावे.
६. वरील मार्गाने ह्रदय परिवर्तन झाले तर चांगलेच आहे नाही तर कामगारांनी भांडवलदाराच्या नफ्यात सहभागी व्हावे. तेव्हा भांडवलदाराचे डोळे उघडतील.

**महात्मा गांधीचे राजकीय विचार :**

महात्मा गांधीच्या विचारांचा वेध घेतांना त्यांचे राजकीय तत्वज्ञान व प्रत्यक्ष कार्य या दृष्टीने त्यांच्या राजकीय विचारांचे पैलु अभ्यासणे योग्य ठरते. गांधीवाद, धार्मिक मानवतवावाद, सत्य, अहिंसा, सत्याग्रह, सत्याग्रहाचे मार्ग, विधायक कार्यक्रम, ग्राम राज्याची कल्पना, विश्वस्तवृत्ती, स्वराज्य, आंदोलन, धर्म, राजकारण आणि साम्यवाद इत्यादी गोष्टींचा अभ्यास राजकीय विचारात होतो.

**साध्य-साधन संबंध :**

राजकारणात साधनांच्या शुध्दतेचा विचार कोणी करीत नाही. विचार होतो तो यश-अपयशाचा, विजयाचा गौरव करण्याची परंपरा जुनीच आहे. राज्यकर्त्यांने फक्त विजयाचा विचार करावा त्यासाठी कोणताही मार्ग अवलंबिला तरी चालेल. निती अनीतीचा त्याने विचार करू नये, असा स्पष्ट इशारा प्रबोधनकालीन इटालियन विचारवंत मेकॅव्होलीने दिला होता.

**राजकीय सत्तेचे विकेंद्रिकरण :**

राजकीय सत्तेसाठी पंचायत राजची आदर्श व्यवस्था ठेवली होती. यात लोकांनी लोकाद्वारे निवडलेले शासन ग्रामीण शासनात म.गांधीना अभिप्रेत होते. ग्रामसभेच्या माध्यमातुन सार्वजनिक तलाव, विहीर, व्यवसाय आणावेत. त्याचा न्याय निवाडा गावतच व्हावा असे त्यांचे मत होत. ग्रामसभेतून जी सार्वजनिक कामे रस्ते, लघु सिंचन तलाव, आरोग्य या सर्व समस्या गावातूनच पुर्ण व्हाव्यात म्हणून त्यांनी ग्रामीण विकासाकरता राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण केले.

**स्वदेशीची कल्पना :**

गांधीजींच्या दृष्टीने स्वदेशी मानवाची असणारी एक कृतीप्रेरणा आहे. स्वदेशी म्हणजे आपल्या जवळच्या परिसरात, गावात निर्माण केलेल्या गोष्टी. म्हणजेच आपल्या धर्माचे पालन, आचरण करणे होय. राजकीय क्षेत्रात स्वदेशी म्हणजेच आपल्याला योग्य अशा राजकीय व्यवस्थेचा अंगिकार करणे होय. स्वदेशी म्हणजे देशाचा अभिमान आहे. स्वदेशीचा वापर म्हणजे मानवता व प्रेम या दोन प्रेरणांतून आपले कृत्य घडते. संपूर्ण समाज उत्पादन प्रक्रियेत गुंतला तर बेकारी, दारिद्र्य, अतिरिक्त उत्पादन या समस्या भेडसावणार नाहीत. स्वदेशीमुळे शेतीला पुरक धंदा मिळेल. म्हणजेच स्वदेशी ही सर्व गरजा पुरविणारी कामधेनु होय. यासाठी त्यांनी खादी ग्रामोद्योग यांना महत्त्व दिले. गांधीजींच्या मते, स्वदेशीमुळे आर्थिक पारतंत्र्य टाळता येईल. मरणप्राय अवस्थेत पोहोचलेले भारतीय उद्योग टिकतील. भारतीयांना रोजगार मिळेल, त्यांचा राहणीमानाचा दर्जा उंचावेल. गांधीजी म्हणतात, सत्तर टक्के लोक खेड्यात राहतात. या लोकाविषयीची कर्तव्याची पुर्तता प्रथम: आम्ही केली पाहिजे. स्वदेशी तत्त्व स्वीकारले की स्वाभाविकपणेच ग्रामस्वावलंबन, ग्रामस्वयंपूर्णता निर्माण करण्याच्या दिशेला पाऊले उचलता येतील. स्वदेशीच्या प्रयोगातून हजारो लोकांच्या हाताला काम मिळेल व देशाभिमान जागृत होईल.

**समारोप :**

गांधीजींचे विचार केवळ राजकिय, आर्थीक, सामाजिक क्षेत्रापुरते मर्यादीत नाही तर त्यांनी व्यक्तीच्या आणि समाजाच्या समग्र जीवनाचा विचार केलेला आहे. राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक प्रश्नांवर विचार करून उपाय सूचविले आहेत. गांधीजी हे आर्थीक आणि धार्मिक असल्यामुळे व्यक्तीच्या समग्र जीवनाला त्यांनी अध्यात्मिक अधिष्ठान दिले. गांधी विचारातून पंचायत राजसंबंधी विचार स्विकारण्यात आले. त्यांचे राजकीय अध्यात्मिकरणाचे तत्त्व जर स्विकारले तर राजकारणात क्रांतीकारी परिवर्तन होऊ शकते. मात्र गांधीजीचे विचारानुसार आपण बदल न करू शकल्याने ग्रामीण जीवनात आर्थिक, सामाजिक, राजकिय व शैक्षणिक तत्सम समस्या दिसुन येतात. महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचाराचे केंद्र खेडी होती. आज खेडी ओस पडलेली असून अनेक समस्यांनी वेढलेली आहेत. आज खऱ्या अर्थाने महात्मा गांधीजींचे विचार महत्त्वाचे वाटतात. कारण विकासाची सुरुवात खेड्यापासूनच व्हावी असे म.गांधी मानत असत. ग्रामोद्योग खादी असे अनेक कार्यक्रम त्यांनी खेड्याच्या स्वयंपूर्णतेसाठी समोर ठेवले.

आर्थिक व राजकीय क्षेत्रात ते विकेंद्रीकरणाचा पुरस्कार करतात. खेड्याचा विकास त्याच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेत आत्मनिर्भर अर्थव्यवस्था म्हणून संबोधली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाने आज उत्पादनात वाढ झाली आहे पण त्यातून निर्माण झालेली बेकारी कशी सोडवता येईल. आज भांडवल गुंतवून तंत्रविज्ञानाधिष्ठित कारखाने निघत आहेत. त्यामुळे नवश्रीमंतांचा एक वर्ग वाढत आहे. परंतु त्याचे फायदे गरीब माणसाला मिळण्याची शक्यता नाही. बेकारी कमी करण्यासाठी आपल्याला पुन्हा गांधी विचाराच्या आधारे उत्पादन व्यवस्थेची उभारणी करावी लागेल. प्रत्येकालाच उत्पादन व्यवस्थेत सहभागी करून घेतले तर बेकारीचा प्रश्न आपोआप मिटेल.

गांधीजी म्हणतात, अमेरिकन बांधवांना चरख्याची ओळख करून द्यावीशी वाटते. चरखा हे चिंतनशील यंत्र त्यांना अणुबॉम्बचा विसर पाडेल. म्हणजेच माणूस सामान्य माणसाच्या प्रश्नाचा विचार करू लागला तर अणुबॉम्बची आठवण त्यास होणार नाही. आज भारतात व जगात सर्वत्रच वंश, जात, धर्म, पंथ, भाषा याबाबत मानव समूहात अहंभाव तीव्र झाल्यामुळे जगभर हिंसाचार, रक्तपात उसळला आहे. म्हणून शांततामय मार्गाने वाटाघाटी अहिंसामय सामूदायिक कृती, सत्याग्रह, नैतिक दबाव इ. गांधीजींचे मूलमंत्र शांततामय सहजीवनासाठी आजही दिपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरणारे आहेत.

**संदर्भ ग्रंथसूची :**

१. आर्थिक विचारांचा इतिहास – प्रा. प. आर. रायखेलकर
२. भारतीय राजकीय व्यवस्थेचा आकृतिबंध खंड १ तुकाराम जाधव व महेश शिरपूरकर
३. गांधी विचारदर्शन – ग्रामस्वराज्य
४. गांधी विचारदर्शन – अर्थकारण
५. भारतीय राजकीय विचारवंत – डॉ. अ. रा. शिंदे., डॉ. रेखा परळीकर
६. राजनिती – चिंतन की रूपरेखा – ओमप्रकाश गाबा
७. राजनिती विज्ञान – अशोककुमार